# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान विभाग

मा. प्रशासकीय सभा दि.१७ /०४/२०२३

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. :- २३ घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये प्लंबींग कामे व सिंचन व्यवस्था करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जे.पी. इंन्फ्रा येथील रस्त्यावरील दुभाजकामध्ये नव्याने उद्यान विकसीत करण्यात येणार असुन सदर उद्यानातील झाडांना दैनंदिन पाणी देणेकामी प्लंबींग कामे व सिंचन व्यवस्था (तुषार सिंचन) करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास शहर अभियंता यांनी तांत्रिक मान्यता देण्यात आलेली असून त्याकामी खालील प्रमाणे अंदाजीत खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (सर्व करासहीत) |
|---|---|---|
| १ | घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये प्लंबींग कामे व सिंचन व्यवस्था करणे. | रु.३१,५५,६६६/- |

सदरचे काम हे करण्याकरीता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात उद्यान विभागातील **"उद्याने/दुभाजक सुशोभिकरण करणे"** या लेखाशिर्षा अंतर्गत रु. ३५०.०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कामी रु.३१,५५,६६६/- इतका खर्च अपेक्षित असुन सदर लेखाशिर्षा मधुन खर्च करण्यात येणार आहे.

सबब, घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये प्लंबींग कामे व सिंचन व्यवस्था करणेकामी ई-टेंडरींग (ऑनलाईन) पध्दतीने निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा. प्रशासक यांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस असे.

**(कल्पिता पिंपळे)**
**उप. आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

**प्रशासकीय ठराव दि. १७ /०४/२०२३ रोजी वाजता.**

**प्रकरण क्र. २३ :- घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये प्लंबींग कामे व सिंचन व्यवस्था करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जे.पी. इंन्फ्रा येथील रस्त्यावरील दुभाजकामध्ये नव्याने उद्यान विकसीत करण्यात येणार असुन सदर उद्यानातील झाडांना दैनंदिन पाणी देणेकामी प्लंबींग कामे व सिंचन व्यवस्था (तुषार सिंचन) करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास शहर अभियंता यांनी तांत्रिक मान्यता देण्यात आलेली असून त्याकामी खालील प्रमाणे अंदाजीत खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (सर्व करासहीत) |
|---|---|---|
| १ | घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये प्लंबींग कामे व सिंचन व्यवस्था करणे. | रु.३१,५५,६६६/- |

सदरचे काम हे करण्याकरीता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात उद्यान विभागातील **"उद्याने/दुभाजक सुशोभिकरण करणे"** या लेखाशिर्षा अंतर्गत रु. ३५०.०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कामी रु.३१,५५,६६६/- इतका खर्च अपेक्षित असुन सदर लेखाशिर्षा मधुन खर्च करण्यात येणार आहे.

सबब, घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये प्लंबींग कामे व सिंचन व्यवस्था करणेकामी ई-टेंडरींग (ऑनलाईन) पध्दतीने निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा.प्रशासक यांची आर्थिक व प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. २३ दि. १७ /०४/२०२३**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये प्लंबींग कामे व सिंचन व्यवस्था करणेकामी ई-टेंडरींग (ऑनलाईन) निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये प्लंबींग कामे व सिंचन व्यवस्था करणेकामी ई-टेंडरींग (ऑनलाईन) पध्दतीने निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता ठरावाद्वारे देण्यात येत आहे. पारीत ठरावानुसार उद्यान विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. प्रशासकीयसभा दि.१७/०४/२०२३

## गोषवारा

प्रकरण क्र.२४ :- संपुर्ण मालमत्ता कराचा आगाऊ भरणा केल्यास चालु वर्षाच्या करावर सुट देणे बाबत.

संदर्भ :- मा. आयुक्त यांची दि. १२/०४/२०२३ रोजीची या प्रस्तावास मान्यता.

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विकासकामे तसेच महापालिकेची आवश्यक कर्तव्ये बजाविणेकरीता होणा-या खर्चाची तरतुद करण्याकरीता मालमत्ता कर हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीमध्ये अंदाजे एकुण ३.५० लाख इतक्या मालमत्तांना कराची आकारणी करण्यात आलेली असुन गतवर्षी यापैकी ३.१० लाख मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केलेला आहे.

मालमत्ता कराची मागणी देयक बजाविले नंतर मालमत्ता कराचा भरणा करणेकरीता अधिनियमान्वये विहित मुदत देण्यात येते. सदर विहित मुदतीत कराचा भरणा न करणा-या मालमत्ता धारक यांना देयक बजावल्यानंतर अधिनियमातील प्रकरण ८ कराधान नियम चे कलम ४१ नुसार शास्तीची आकारणी करण्यात येते.

तथापी, मालमत्ता कराचा नियमीत व विहित मुदतीत कराचा भरणा करणा-या मालमत्ता धारकांना प्रोत्साहन देण्यासाठी आगाऊ कर भरणा-या मालमता धारकांसाठी सवलत देणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४०-अ मध्ये पुढील तरतुद आहे.  या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यतः पात्र मालमत्ता असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर, संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर, तिला महानगरपालिका, सर्वसाधारण आगाऊ आदेशाद्वारे निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या भरण्यातून वापरकर्त्यांच्या वेगवेगळ्या वर्गाकरिता अशी सूट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील. 

सबब, उक्त कलमान्वये सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारक यांनी मालमत्ता कराची देयक बजाविले नंतर बिलात विनिर्दिष्टीत केलेल्या दिनांकापुर्वी संपुर्ण वर्षाकरीता कराचा थकबाकीसह आगाऊ भरणा केल्यास चालु वर्षाच्या मालमत्ता करा मध्ये खालील तक्त्याप्रमाणे सवलत (सुट) देणे उचित वाटते.

| अ.क्रं. | कर भरणा कालावधी | कर शिर्षक | सवलत / सुट टक्केवारी चालु वर्षात करामध्ये (२०२३-२४) |
|---|---|---|---|
| १ | ३० जुन पर्यंत | मोठ्या निवासी मालमत्ता कर, शासकीय शिक्षण कर, शासकीय रोजगार हमी कर, घनकरचरा शुल्क वगळुन इतर सर्व करावर | ५% |
| २ | ३१ जुलै पर्यंत | | ३% |

उपरोक्त प्रमाणे संपुर्ण मालमत्ता कराचा थकबाकीसह आगाऊ भरणा केल्यावर चालु मागणीमध्ये सवलत / सुट दिल्यास मालमत्ता धारक यांचेकडुन मालमत्ता कर भरणा वेळेत करण्याकडे मालमत्ता धारकांचा

कल वाढेल, त्यामुळे मालमत्ता कराचे उद्दीष्ट साध्य होण्यास मदत होईल असे विभागाचे मत आहे. तसेच सदर आगाऊ कर भरणा प्राप्त झाल्यामुळे महानगरपालिकेला विकास कामासाठी सदर निधीचा वापर करता येईल.

तरी, आगाऊ मालमत्ता कर भरणा करणा-या मालमत्ता धारक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४०-अ मधील तरतुदीनुसार सन २०२३-२४ या वर्षात मालमत्ता कराची देयक बजाविले नंतर संपुर्ण मालमत्ता कराचा उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत आगाऊ भरणा केल्यास चालु मागणी रक्कमेवर सवलत / सुट देणेकरीता मा. प्रशासक यांची मान्यता मिळावी.

12/4

(संजय शिंदे)
उप-आयुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने

दि. १२/४/२०२३ ... वेळ सायं. ४-३० वा
प्रशासकीय पत्र ... गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. ... १६ ... सन 2023/24
१२/४/2023
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सर्वसाधारण सभा

## प्रशासकिय ठराव दि.१५/०५/२०२३ रोजी दुपारी ०३:०० वाजता

**प्रकरण क्र.२५** :- संपुर्ण मालमत्ता कराचा आगाऊ भरणा केल्यास चालु वर्षाच्या करावर सुट देणे बाबत.

## कार्यालयीन प्रस्ताव

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विकासकामे तसेच महापालिकेची आवश्यक कर्तव्ये बजाविणेकरीता होणाऱ्या खर्चाची तरतुद करण्याकरीता मालमत्ता कर हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीमध्ये अंदाजे एकुण ३.५० लाख इतक्या मालमत्तांना कराची आकारणी करण्यात आलेली असुन गतवर्षी यापैकी ३.१० लाख मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केलेला आहे.

मालमत्ता कराची मागणी देयक बजाविले नंतर मालमत्ता कराचा भरणा करणेकरीता अधिनियमान्वये विहित मुदत देण्यात येते. सदर विहित मुदतीत कराचा भरणा न करणा-या मालमत्ता धारक यांना देयक बजावल्यानंतर अधिनियमातील प्रकरण ८ कराधान नियम चे कलम ४१ नुसार शास्तीची आकारणी करण्यात येते.

तथापी, मालमत्ता कराचा नियमीत व विहित मुदतीत कराचा भरणा करणा-या मालमत्ता धारकांना प्रोत्साहन देण्यासाठी आगाऊ कर भरणा-या मालमत्ता धारकांसाठी सवलत देणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४०-अ मध्ये पुढील तरतुद आहे. "या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यतः पात्र मालमत्ता असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर, संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर, तिला महानगरपालिका, सर्वसाधारण आगाऊ आदेशाद्वारे निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या भरण्यातून वापरकर्त्याच्या वेगवेगळ्या वर्गाकरिता अशी सूट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील."

सबब, उक्त कलमान्वये सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारक यांनी मालमत्ता कराची देयक बजाविले नंतर बिलात विनिर्दिष्टीत केलेल्या दिनांकापुर्वी संपुर्ण वर्षाकरीता कराचा थकबाकीसह आगाऊ भरणा केल्यास चालु वर्षाच्या मालमत्ता करा मध्ये खालील तक्त्याप्रमाणे सवलत (सुट) देणे उचित वाटते.

| अ.क्रं. | कर भरणा कालावधी | कर शिर्षक | सवलत / सुट टक्केवारी चालु वर्षात करामध्ये (२०२३-२४) |
|---|---|---|---|
| १ | ३० जुन पर्यंत | मोठ्या निवासी मालमत्ता कर, शासकीय शिक्षण कर, शासकीय रोजगार हमी कर, घनकरचरा शुल्क वगळुन इतर सर्व करांवर | ५% |
| २ | ३१ जुलै पर्यंत | | ३% |

उपरोक्त प्रमाणे संपुर्ण मालमत्ता कराचा थकबाकीसह आगाऊ भरणा केल्यावर चालु मागणीमध्ये सवलत/ सुट दिल्यास मालमत्ता धारक यांचेकडुन मालमत्ता कर भरणा वेळेत करण्याकडे मालमत्ता धारकांचा कल वाढेल, त्यामुळे मालमत्ता कराचे उद्दीष्ट साध्य होण्यास मदत होईल असे विभागाचे मत आहे. तसेच सदर आगाऊ कर भरणा प्राप्त झाल्यामुळे महानगरपालिकेला विकास कामासाठी सदर निधीचा वापर करता येईल.

तरी, आगाऊ मालमत्ता कर भरणा करणा-या मालमत्ता धारक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४०-अ मधील तरतुदीनुसार सन २०२३-२४ या वर्षात मालमत्ता कराची देयक बजाविले नंतर संपुर्ण मालमत्ता कराचा उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत आगाऊ भरणा केल्यास चालु मागणी रक्कमेवर सवलत / सुट देणेकरीता मा. प्रशासक यांची मान्यता मिळणेस शिफारस असे.

## सर्वसाधारण सभा प्रशासकिय ठराव क्र. २४ दिनांक १८/४/2023

प्रशासनाने सादर केलेला गोषवारा विचारात घेवून आगाऊ मालमत्ता कर भरणा करणाऱ्या मालमत्ता धारक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४०-अ मधील तरतुदीनुसार सन २०२३-२४ या वर्षात मालमत्ता कराची देयक बजाविले नंतर विहीत मुदतीत मालमत्ता कराचा संपूर्ण कराचा भरणा करणाऱ्या नागरीकांना खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे सवलत (सुट) देण्यास मंजूर देणेत येत आहे.

| अ.क्रं. | कर भरणा कालावधी | कर शिर्षक | सवलत / सुट टक्केवारी चालु वर्षात करामध्ये (२०२३-२४) |
|---|---|---|---|
| १ | ३० जुन पर्यंत | मोठ्या निवासी मालमत्ता कर, शासकीय शिक्षण कर, शासकीय रोजगार हमी कर, घनकरचरा शुल्क वगळुन इतर सर्व करांवर | ५% |
| २ | ३१ जुलै पर्यंत | | ३% |

मालमत्ता कर विभागाने वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार विहीत कालावधीत मालमत्ता कराचा भरणा करण्याऱ्या नागरीकांना मालमत्ता करात सवलत देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच या करीता मालमत्ता कराच्या संगणकीय आज्ञावलीत उचित बदल करण्यात यावे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग
## प्रशासकीय गोषवारा दि.१७/04/2023

प्रकरण क्र. :- २५ मनपा. क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, टोरस, हायड्रा मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा करणे कामी प्राप्त निविदेतील दरास मंजुरीबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, टोरस, हायड्रा मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा दि. 15/03/2023 रोजीच्या दै. प्रात:काल, दै. सागर या वृत्तपत्रात व व Tender Id No. 2023_MBMC_884453_1 जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. मुदतीत दि. 31/03/2023 पर्यंत **04** प्राप्त झाल्या असून निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी, मे. एम.बी. ब्रदर्स, मे. एम. ई. प्रोजेक्ट प्रा. लि. व मे. एस. के. डेव्हलपर्स यांचे दि. 03/04/2023 रोजी तांत्रिक लिफाफे उघडण्यात आले असता, तांत्रिक लिफाफ्यामध्ये निविदा अटीशर्तीनुसार सादर केलेली कागदपत्रे विभागाने छाननी केली असून मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी व मे. एम.बी. ब्रदर्स यांनी तांत्रिक कागदपत्रांची पुर्तता केली आहे. त्यामुळे त्यांची निविदा पात्र ठरली आहे. सदर कामाची निकड व अत्यावश्यक बाब म्हणून महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग दि. 01/12/2016 मधील नियम 4.4.3.1 नुसार सदर निविदेतील पात्र निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी व मे. एम.बी. ब्रदर्स यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) उघडणेस दि. 05/04/2023 रोजी मा. निविदा समितीने शिफारस केली असून दि. 06/04/2023 रोजी मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

वरीलप्रमाणे निविदेतील पात्र निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी व मे. एम.बी. ब्रदर्स यांचा दराचा लिफाफा (Financial Bid) दि. 10/04/2023 रोजी उघडण्यात आला असता, खालीलप्रमाणे दर सादर केले असून मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी व मे. एम.बी. ब्रदर्स या निविदाकारांनी सादर केलेल्या दराची तुलना केली असता, मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचे दर कमी आहेत. मात्र सादर केलेले दर बाजार भावाशी तुलना केली असता, जादा आहेत. त्यामुळे मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचे समवेत दरात वाटाघाटी करणेसाठी दि.13/04/2023 रोजी निविदा समिती समोर बोलविले असता, मा. निविदा समिती अध्यक्ष यांचे समक्ष L1 निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी उपस्थितीत दर कमी केले आहेत. सदरचे कमी केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Type of Machinery, Equipments | मे. एम.बी. ब्रदर्स यांनी सादर केलेले दर | मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी सादर केलेले दर (L1) | L1 निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1 | POCLAIN MACHINE - 200 | Rs. 2,350/- PER HOUR | Rs. 2,100/- PER HOUR | **Rs. 2,100/- PER HOUR** |
| 2 | POCLAIN MACHINE WITH BOAT | Rs. 2,750/- PER HOUR | Rs. 2,350/- PER HOUR | **Rs. 2,350/- PER HOUR** |
| 3 | JCB MACHINE | Rs. 1,300/- PER HOUR | Rs. 1,250/- PER HOUR | **Rs. 1,190/- PER HOUR** |
| 4 | TORAS | Rs. 11,000/- PER SHIFT | Rs. 9,950/- PER SHIFT | **Rs. 9,950/- PER SHIFT** |
| 5 | DUMPER | Rs. 9,000/- PER SHIFT | Rs. 7,000/- PER SHIFT | **Rs. 7,000/- PER SHIFT** |

| Sr. No. | Type of Machinery, Equipments | मे. एम.बी. ब्रदर्स यांनी सादर केलेले दर | मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी सादर केलेले दर (L1) | L1 निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 6 | HAYDRA MACHINE | Rs. 1,100/- PER HOUR | Rs. 990/- PER HOUR | **Rs. 990/- PER HOUR** |
| 7 | MAN POWER | Rs. 1,260/- PER LABOUR /PER DAY (08 HOUR) | Rs. 1,224/- PER LABOUR /PER DAY (08 HOUR) | **Rs. 1,224/- PER LABOUR /PER DAY (08 HOUR)** |

वरीलप्रमाणे L1 निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले दर बाजारभावशी तुलना केली असता, वाजवी असून त्यांची निविदा स्विकारणेस मा. निविदा समितीने शिफारस केली आहे.

तरी, महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, टोरस, हायड्रा मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा कामी कामी मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराची निविदा स्विकारणे, करारनामा करुन कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

**(कल्पिता पिंपळे)**
**उपायुक्त (घ.व्य.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. 13/04/2023 वेळ: 12.00
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा क्र. प्रशासकीय
रजिस्टर अ.क्र. 20 वर्ष :- 2023-24

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Goshwara Nala Safai 2023.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग
## प्रशासकीय ठराव दि.१८/04/2023

**प्रकरण क्र. :- २५ मनपा. क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, टोरस, हायड्रा मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा करणे कामी प्राप्त निविदेतील दरास मंजुरीबाबत.**

**ठराव क्र. :-** २५

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, टोरस, हायड्रा मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा दि. 15/03/2023 रोजीच्या दै. प्रात:काल, दै. सागर या वृत्तपत्रात व व Tender Id No. 2023_MBMC_884453_1 जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. मुदतीत दि. 31/03/2023 पर्यंत **04** प्राप्त झाल्या असून निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी, मे. एम.बी. ब्रदर्स, मे. एम. ई. प्रोजेक्ट प्रा. लि. व मे. एस. के. डेव्हलपर्स यांचे दि. 03/04/2023 रोजी तांत्रिक लिफाफे उघडण्यात आले असता, तांत्रिक लिफाफ्यामध्ये निविदा अटीशर्तीनुसार सादर केलेली कागदपत्रे विभागाने छाननी केली असून मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी व मे. एम.बी. ब्रदर्स यांनी तांत्रिक कागदपत्रांची पुर्तता केली आहे. त्यामुळे त्यांची निविदा पात्र ठरली आहे. सदर कामाची निकड व अत्यावश्यक बाब म्हणून महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग दि. 01/12/2016 मधील नियम 4.4.3.1 नुसार सदर निविदेतील पात्र निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी व मे. एम.बी. ब्रदर्स यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) उघडणेस दि. 05/04/2023 रोजी मा. निविदा समितीने शिफारस केली असून दि. 06/04/2023 रोजी मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

वरीलप्रमाणे निविदेतील पात्र निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी व मे. एम.बी. ब्रदर्स यांचा दराचा लिफाफा (Financial Bid) दि. 10/04/2023 रोजी उघडण्यात आला असता, खालीलप्रमाणे दर सादर केले असून मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी व मे. एम.बी. ब्रदर्स या निविदाकारांनी सादर केलेल्या दराची तुलना केली असता, मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचे दर कमी आहेत. मात्र सादर केलेले दर बाजार भावाशी तुलना केली असता, जादा आहेत. त्यामुळे मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचे समवेत दरात वाटाघाटी करणेसाठी दि.13/04/2023 रोजी निविदा समिती समोर बोलविले असता, मा. निविदा समिती अध्यक्ष यांचे समक्ष L1 निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी उपस्थितीत दर कमी केले आहेत. सदरचे कमी केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Type of Machinery, Equipments | मे. एम.बी. ब्रदर्स यांनी सादर केलेले दर | मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी सादर केलेले दर (L1) | L1 निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1 | POCLAIN MACHINE - 200 | Rs. 2,350/- PER HOUR | Rs. 2,100/- PER HOUR | **Rs. 2,100/- PER HOUR** |
| 2 | POCLAIN MACHINE WITH BOAT | Rs. 2,750/- PER HOUR | Rs. 2,350/- PER HOUR | **Rs. 2,350/- PER HOUR** |
| 3 | JCB MACHINE | Rs. 1,300/- PER HOUR | Rs. 1,250/- PER HOUR | **Rs. 1,190/- PER HOUR** |

| Sr. No. | Type of Machinery, Equipments | मे. एम.बी. ब्रदर्स यांनी सादर केलेले दर | मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी सादर केलेले दर (L1) | **L1 निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर** |
|---|---|---|---|---|
| 4 | TORAS | Rs. 11,000/- PER SHIFT | Rs. 9,950/- PER SHIFT | **Rs. 9,950/- PER SHIFT** |
| 5 | DUMPER | Rs. 9,000/- PER SHIFT | Rs. 7,000/- PER SHIFT | **Rs. 7,000/- PER SHIFT** |
| 6 | HAYDRA MACHINE | Rs. 1,100/- PER HOUR | Rs. 990/- PER HOUR | **Rs. 990/- PER HOUR** |
| 7 | MAN POWER | Rs. 1,260/- PER LABOUR /PER DAY (08 HOUR) | Rs. 1,224/- PER LABOUR /PER DAY (08 HOUR) | **Rs. 1,224/- PER LABOUR /PER DAY (08 HOUR)** |

वरीलप्रमाणे L1 निविदाधारक मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले दर बाजारभावशी तुलना केली असता, वाजवी असून त्यांची निविदा स्विकारणेस मा. निविदा समितीने शिफारस केली आहे.

तरी, महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, टोरस, हायड्रा मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा कामी कामी मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराची निविदा स्विकारणे, करारनामा करुन कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Goshwara Nala Safai 2023.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

## प्रशासकीय गोषवारा दि.१७/४/2023

**प्रकरण क्र :- २८ मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (घनकचरा व्यवस्थापन विभाग)**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2023 सुरू असून या सर्वेक्षणात स्वच्छ सर्वेक्षण 2023, ODF ++ /Water Plus व Garbage Free City, महानगरपालिकेतर्फे देत असलेल्या विविध सेवांबाबत नागरीकांमध्ये जनजागृती करणे तथा स्वचछ सर्वेक्षण 2023 खालीलप्रमाणे विविध कमाच्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | ठेकेदाराचे नाव | कामाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2023 करीता सार्वजनिक ठिकाणी कचरा साठवण कामी स्टेनलेस स्टील डस्टबिन खरेदी करणे. | मे. कॉटीप्रो इंडस्ट्रीज | Rs. 24,84,000/- |
| 2. | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2023 करीता मनपा. क्षेत्रातील Comercial Area/ दर्शनिय ठिकाणी, स्टेशन परिसर इत्यादी ठिकाणी व मा.नगरसेवक /नगरसेवक यांनी त्यांच्या वॉर्डातील सुचविलेल्या ठिकाणच्या दर्शनीय भागात स्वच्छतेबाबतचे संदेश ऐक्रेलिक पेंटद्वारे भिंती रंगविणे. | मे. आराध्या इंटरप्रायजेस. | Rs. 9,99,319/- |
| 3. | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2023 करीता फ्लाय ओव्हरची भिंतीवर स्वच्छतेबाबतचे संदेश ऐक्रेलिक पेंटद्वारे भिंती रंगविणे. | मे. आराध्या इंटरप्रायजेस. | Rs. 9,97,190/- |
| 4. | Segregation at Source मोहिमेचे जनजागृती कामाचे विविध स्टिकर्स व घनकचरा नोटीस नमुना छपाई करणे | मे. यमुना इंटरप्रायजेस | Rs. 6,00,000/- |

घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत स्वच्छ सर्वेक्षण 2023 करीता अ.क्र. 02 ते 04 करीता वरील नमुद केलेली कामे पुर्ण करून घेण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे स्वच्छ सर्वेक्षण 2023 मध्ये कचरा साठवण कामी स्टेनलेस स्टील डस्टबिन खरेदी करणे अ.क्र. 01 कामास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

तरी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (D) नुसार मा. प्रशासक यांच्या मंजुरीकरीता अवलोकनार्थ सादर.

(रवि पवार)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

\\Aarogya\d\Raj Documents\STANDING GOSHVARA\SBM janjagruti bill goshwara 2022-23.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

## प्रशासकीय ठराव दि.१७/ ४ /2023

**प्रकरण क्र. २६ :-** **मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (घनकचरा व्यवस्थापन विभाग)**

**ठराव क्र. २६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2023 सुरू असून या सर्वेक्षणात स्वच्छ सर्वेक्षण 2023, ODF ++ /Water Plus व Garbage Free City, महानगरपालिकेतर्फे देत असलेल्या विविध सेवांबाबत नागरीकांमध्ये जनजागृती करणे तथा स्वचछ सर्वेक्षण 2023 खालीलप्रमाणे विविध कमाच्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | ठेकेदाराचे नाव | कामाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2023 करीता सार्वजनिक ठिकाणी कचरा साठवण कामी स्टेनलेस स्टील डस्टबिन खरेदी करणे. | मे. कॉटींप्रो इंडस्ट्रीज | Rs. 24,84,000/- |
| 2. | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2023 करीता मनपा. क्षेत्रातील Comercial Area/ दर्शनिय ठिकाणी, स्टेशन परिसर इत्यादी ठिकाणी व मा.नगरसेवक /नगरसेवक यांनी त्यांच्या वॉर्डातील सुचविलेल्या ठिकाणच्या दर्शनीय भागात स्वच्छतेबाबतचे संदेश ऐक्रेलिक पेंटद्वारे भिंती रंगविणे. | मे. आराध्या इंटरप्रायजेस. | Rs. 9,99,319/- |
| 3. | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2023 करीता फ्लाय ओव्हरची भिंतीवर स्वच्छतेबाबतचे संदेश ऐक्रेलिक पेंटद्वारे भिंती रंगविणे. | मे. आराध्या इंटरप्रायजेस. | Rs. 9,97,190/- |
| 4. | Segregation at Source मोहिमेचे जनजागृती कामाचे विविध स्टिकर्स व घनकचरा नोटीस नमुना छपाई करणे | मे. यमुना इंटरप्रायजेस | Rs. 6,00,000/- |

घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत स्वच्छ सर्वेक्षण 2023 करीता अ.क्र. 02 ते 04 करीता वरील नमुद केलेली कामे पुर्ण करून घेण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे स्वच्छ सर्वेक्षण 2023 मध्ये कचरा साठवण कामी स्टेनलेस स्टील डस्टबिन खरेदी करणे अ.क्र. 01 कामास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

तरी, वरील प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (D) नुसार अवलोकन केले असुन अवलोकनास मंजुरी देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**उद्यान विभाग**

~~मा. महासभा~~ प्रशासकीय दि. १७/०४/२०२३

// गोषवारा //

**प्रकरण क्र. :-२७ हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता मिरारोड (पु.) जे.पी. इंन्फ्रा रोड येथे ग्रीन स्पेस तयार करुन पाण्याचे कारंजे बसविणे व निगा व देखभाल करणेकामी ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या निविदेबाबत.**
**(Tender ID. NIC २०२२_MBMC_८५२०८८_१)**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता वाढविण्याकरीता विविध उपाय योजना करण्याकरीता तसेच वाहनांमुळे होणारे हवेचे प्रदुषण कमी करण्याकरीता व हवेतील धुळीचे प्रमाण कमी करुन हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता रस्त्याच्या दुभाजकामध्ये, दुतर्फा मोठ्या प्रमाणात झाडे लावून ग्रीन स्पेस तयार करणे आवश्यक आहे.

तसेच १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त अनुदानातुन "स्वच्छ हवा कृती आराखडा" राबविण्यात आलेल्या तसेच त्या अंतर्गत प्राप्त निधी मधुन हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता विविध उपाय योजना करावयाचे आहे. तसेच १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त अनुदानातुन "स्वच्छ हवा कृती आराखडा" राबविण्यात आलेल्या तसेच त्या अंतर्गत प्राप्त निधी मधुन मिरारोड (पु.) जे.पी. इंन्फ्रा रोड येथे ग्रीन स्पेस तयार करुन पाण्याचे कारंजे बसविणे व निगा व देखभाल करणेकामी. मा. आयुक्त सो. यांच्या दि.१४/१०/२०२२ रोजीच्या मान्यतेने खालील प्रमाणे निविदा मागविण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पु.) जे.पी. इंन्फ्रा रोड येथे ग्रीन स्पेस तयार करुन पाण्याचे कारंजे बसविणे व निगा व देखभाल करणेकामी दि.१६/११/२०२२ रोजीची जाहिर सुचनेनुसार ई-टेंडरिंग ऑनलाईन पध्दतीने व दै. खबरे आजतक, मुंबई मित्र व जनादेश या वृत्तपत्रात प्रसिध्दी देवुन दि.१८/११/२०२२ ते दि.१२/१२/२०२२ या कालावधीत जाहिर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

सदर कालावधीमध्ये प्राप्त ०४ निविदाधारकांची Technical Bid दि. १५/१२/२०२२ रोजी उघडण्यात आले असता प्राप्त ०४ निविदाधारकांच्या कागदपत्रांची पडताळणी मा. निविदा समिती समोर करुन पात्र ०३ निविदाधारकांची Financial Bid उघडण्यास दि.१९/१२/२०२२ रोजी मा. निविदा समितीने शिफारस करुन दि.२१/१२/२०२२ रोजी मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पात्र ०३ निविदांची Financial Bid दि.२३/१२/२०२२ रोजी उघडली मे. शितल लॅण्डस्केप ॲण्ड ॲग्रो सर्व्हिसेस (L१) यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.००% जास्त दराची लघुत्तम L१ निविदा प्राप्त झालेली असुन सदर दराची वाटाघाटी दि.२८/१२/२०२२ रोजी मा. निविदा समिती समोर केली असता. अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १५.००% जास्त दराने निविदा स्विकारण्यास निविदा समितीने शिफारस केलेली होती. तसेच पार्क ॲण्ड गार्डनच्या सन २०१५-१६ च्या दरसूचीत एकुण १५% वाढ सद्यस्थितीत करता येऊ शकते याबाबत संचालक, उपवने व उदयाने महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी जा.क्र./संउपउमुं/दरसूची/१७२५ दि.१२/१२/२२ पत्रान्वये कळविले आहे. तसेच मा. आयुक्त सो. यांनी सदर दरामध्ये वाटाघाटी केलेली असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No | कामाचा तपशिल | दर (सर्व करासह) GST सह | | |
|---|---|---|---|---|
| | | Estimate cost | Sheetal Landscape and Agro Services | M/s. Sheetal Landscape and Agro Services यांचे वाटाघाटी अंतीचे दर |
| १ | Creation of green space and installation of water fountains with Maintenance at JP Infra Road, Miraroad (E) to improve air quality in MBMC area. (15th Finance commission Fund) | Rs.3,13,57,857/- | Rs. 3,70,02,271.26/- Excess (+) 18.00% | **Rs. 3,44,93,642/- Excess (+) 10.00%** |

वरील नमुद केलेल्या कामा करीता मे. शितल लॅण्डस्केप अँण्ड ॲग्रो सर्व्हिसेस यांनी निविदेत भरलेल्या दरामध्ये वाटाघाटी केलेली आहे. त्यानुसार सदर दराची तुलना बाजार भावाशी केली असता सदर दर हे वाजवी असून मे. शितल लॅण्डस्केप अँण्ड ॲग्रो सर्व्हिसेस (L१) यांची वाटाघाटीअंतीची निविदा स्विकारणेकामी मा.प्रशासक यांच्या मान्यते करीता गोषवारा सादर करण्यास मा. आयुक्त सो. यांनी दि. २३ /०४/२०२३ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पु.) जे.पी. इंन्फ्रा रोड येथे ग्रीन स्पेस तयार करुन पाण्याचे कारंजे बसविणे व निगा व देखभाल करणेकामी मे. शितल लॅण्डस्केप अँण्ड ॲग्रो सर्व्हिसेस यांची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास मा. प्रशासक यांची मान्यता मिळणेस शिफारस असे.

(कल्पिता पिंपळे)
उप. आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २३/४/२०२३ वेळ दु. २.१५वा.
मा. प्रशासकीय गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ......२२..... वर्ष :- २०२३-२४

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान विभाग

**प्रशासकीय ठराव दि.१७/०४/२०२३ रोजी दु.१२.०० वाजता.**

**प्रकरण क्र. २७ :- हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता मिरारोड (पु.) जे.पी. इंन्फ्रा रोड येथे ग्रीन स्पेस तयार करुन पाण्याचे कारंजे बसविणे व निगा व देखभाल करणेकामी ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या निविदेबाबत.**
**(Tender ID. NIC २०२२_MBMC_८५२०८८_१)**

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता वाढविण्याकरीता विविध उपाय योजना करण्याकरीता तसेच वाहनांमुळे होणारे हवेचे प्रदुषण कमी करण्याकरीता व हवेतील धुळीचे प्रमाण कमी करुन हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता रस्त्याच्या दुभाजकामध्ये, दुतर्फा मोठ्या प्रमाणात झाडे लावून ग्रीन स्पेस तयार करणे आवश्यक आहे.

तसेच १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त अनुदानातुन "स्वच्छ हवा कृती आराखडा" राबविण्यात आलेल्या तसेच त्या अंतर्गत प्राप्त निधी मधुन हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता विविध उपाय योजना करावयाचे आहे. तसेच १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त अनुदानातुन "स्वच्छ हवा कृती आराखडा" राबविण्यात आलेल्या तसेच त्या अंतर्गत प्राप्त निधी मधुन मिरारोड (पु.) जे.पी. इंन्फ्रा रोड येथे ग्रीन स्पेस तयार करुन पाण्याचे कारंजे बसविणे व निगा व देखभाल करणेकामी. मा. आयुक्त सो. यांच्या दि.१४/१०/२०२२ रोजीच्या मान्यतेने खालील प्रमाणे निविदा मागविण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पु.) जे.पी. इंन्फ्रा रोड येथे ग्रीन स्पेस तयार करुन पाण्याचे कारंजे बसविणे व निगा व देखभाल करणेकामी दि.१६/११/२०२२ रोजीची जाहिर सुचनेनुसार ई-टेंडरिंग ऑनलाईन पध्दतीने व दै. खबरे आजतक, मुंबई मित्र व जनादेश या वृत्तपत्रात प्रसिध्दी देवुन दि.१८/११/२०२२ ते दि.१२/१२/२०२२ या कालावधीत जाहिर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

सदर कालावधीमध्ये प्राप्त ०४ निविदाधारकांची Technical Bid दि. १५/१२/२०२२ रोजी उघडण्यात आले असता प्राप्त ०४ निविदाधारकांच्या कागदपत्रांची पडताळणी मा. निविदा समिती समोर करुन पात्र ०३ निविदाधारकांची Financial Bid उघडण्यास दि.१९/१२/२०२२ रोजी मा. निविदा समितीने शिफारस करुन दि.२१/१२/२०२२ रोजी मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पात्र ०३ निविदांची Financial Bid दि.२३/१२/२०२२ रोजी उघडली मे. शितल लॅण्डस्केप ॲण्ड ॲग्रो सर्व्हिसेस (L१) यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.००% जास्त दराची लघुत्तम L१ निविदा प्राप्त झालेली असुन सदर दराची वाटाघाटी दि.२८/१२/२०२२ रोजी मा. निविदा समिती समोर केली असता, अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १५.००% जास्त दराने निविदा स्विकारण्यास निविदा समितीने शिफारस केलेली होती. तसेच पार्क ॲण्ड गार्डनच्या सन २०१५-१६ च्या दरसूचीत एकुण १५% वाढ सद्यस्थितीत करता येऊ शकते याबाबत संचालक, उपवने व उदयाने महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी जा.क्र./संउपउमुं/दरसूची/१७२५ दि.१२/१२/२२ पत्रान्वये कळविले आहे. तसेच मा. आयुक्त सो. यांनी सदर दरामध्ये वाटाघाटी केलेली असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No | कामाचा तपशिल | दर (सर्व करासह) GST सह | | |
|---|---|---|---|---|
| | | Estimate cost | Sheetal Landscape and Agro Services | M/s. Sheetal Landscape and Agro Services यांचे वाटाघाटी अंतीचे दर |
| १ | Creation of green space and installation of water fountains with Maintenance at JP Infra Road, Miraroad (E) to improve air quality in MBMC area. (15th Finance commission Fund) | Rs.3,13,57,857/- | Rs. 3,70,02,271.26/- Excess (+) 18.00% | **Rs. 3,44,93,642/- Excess (+) 10.00%** |

वरील नमुद केलेल्या कामा करीता मे. शितल लॅण्डस्केप अॅण्ड अॅग्रो सर्व्हिसेस यांनी निविदेत भरलेल्या दरामध्ये वाटाघाटी केलेली आहे. त्यानुसार सदर दराची तुलना बाजार भावाशी केली असता सदर दर हे वाजवी असून मे. शितल लॅण्डस्केप अॅण्ड अॅग्रो सर्व्हिसेस (L१) यांची वाटाघाटीअंतीची निविदा स्विकारणेकामी मा.प्रशासक यांच्या मान्यते करीता गोषवारा सादर करण्यास मा. आयुक्त सो. यांनी दि. १३ /०४/२०२३ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पु.) जे.पी. इंन्फ्रा रोड येथे ग्रीन स्पेस तयार करुन पाण्याचे कारंजे बसविणे व निगा व देखभाल करणेकामी मे. शितल लॅण्डस्केप अॅण्ड अॅग्रो सर्व्हिसे यांची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास मा. प्रशासक यांची मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. २८ दि. १८ /०४/२०२३**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पु.) जे.पी. इंन्फ्रा रोड येथे ग्रीन स्पेस तयार करुन पाण्याचे कारंजे बसविणे व निगा व देखभाल करणेकामी मे. शितल लॅण्डस्केप अॅण्ड अॅग्रो सर्व्हिसे यांची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पु.) जे.पी. इंन्फ्रा रोड येथे ग्रीन स्पेस तयार करुन पाण्याचे कारंजे बसविणे व निगा व देखभाल करणेकामी मे.शितल लॅण्डस्केप अॅण्ड अॅग्रो सर्व्हिसेस यांची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास प्रशासकीय मान्यता ठरावाद्वारे देण्यात येत आहे. पारीत ठरावानुसार उद्यान विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# घनकचरा प्रकल्प विभाग

## मा. प्रशासकिय सभा दि. १५ / ०५ /२०२३

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (२८) :- मा. आयुक्त सो. यांनी दिलेल्या कामांचे अवलोकन करणे.**
**(घनकचरा प्रक्रिया विभाग)**

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नाव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | Project management consultant for supervision on execution of construction of sanitary landfill for Mira Bhayander Municipal Corporation. | रु.१०,००,०००/- (जी. एस.टी. सहित) | मे.अमेय कंन्सल्टंट ॲण्ड इंजिनिअर्स | रु.९,९९,०००/- (जी. एस.टी. सहित) |
| २. | भाईंदर (प.) आरक्षण क्र. १४० येथे बायोगॅस प्रकल्पासाठी येणाऱ्या कचऱ्याचे मोजमाप करण्यासाठी वजनकाटा बसविण्याकरीता Civil कामे करणे. | रु. ७,८८,९००/- (जी. एस.टी. सहित) | मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | रु. ७,८८,९००/- (जी. एस.टी. सहित) |
| ३. | भाईंदर (पु.) आरक्षण क्र. १२२ "ड" येथे बायोगॅस प्रकल्पासाठी येणाऱ्या कचऱ्याचे मोजमाप करण्यासाठी वजनकाटा बसविण्याकरीता Civil कामे करणे. | रु. ७,८८,९००/- (जी. एस.टी. सहित) | मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | रु. ७,८८,९००/- (जी. एस.टी. सहित) |
| ४. | मिरारोड (पु.) आरक्षण क्र. २७१, २७२, २७३ येथे बायोगॅस प्रकल्पासाठी येणाऱ्या कचऱ्याचे मोजमाप करण्यासाठी वजनकाटा बसविण्याकरीता Civil कामे करणे. | रु. ७,८८,९००/- (जी. एस.टी. सहित) | मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | रु. ७,८८,९००/- (जी. एस.टी. सहित) |
| ५. | भाईंदर (प.) आरक्षण क्र. १४० येथे बायोगॅस प्रकल्पासाठी येणाऱ्या कचऱ्याचे मोजमाप करण्यासाठी वजनकाट्याचा पुरवठा करणे व वजनकाटा बसविण्याकरीता Electric ची कामे करणे. | रु.७,३३,७८०/- (जी. एस.टी. सहित) | मे. न्यु फिल्ड | रु.७,३३,७८०/- (जी. एस.टी. सहित) |
| ६. | भाईंदर (पु.) आरक्षण क्र. १२२ "ड" येथे बायोगॅस प्रकल्पासाठी येणाऱ्या कचऱ्याचे मोजमाप करण्यासाठी वजनकाट्याचा पुरवठा करणे व वजनकाटा बसविण्याकरीता Electric ची कामे करणे. | रु.७,३३,७८०/- (जी. एस.टी. सहित) | मे. न्यु फिल्ड | रु.७,३३,७८०/- (जी. एस.टी. सहित) |
| ७. | मिरारोड (पु.) आरक्षण क्र. २७१, २७२, २७३ येथे बायोगॅस प्रकल्पासाठी येणाऱ्या कचऱ्याचे मोजमाप करण्यासाठी वजनकाट्याचा पुरवठा करणे व वजनकाटा बसविण्याकरीता Electric ची कामे करणे. | रु.७,३३,७८०/- (जी. एस.टी. सहित) | मे. न्यु फिल्ड | रु.७,३३,७८०/- (जी. एस.टी. सहित) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | To file petition Before MERC for determination of project specific tariff for supply of electricity for ५७५ KVA capacity as per Prevalent rules and regulation and assist MBMC till tariff order is issued by MERC. | रु. ७,००,०००/- (जी. एस.टी. सहित) | मे. एनर्जी ऑप्टीमा कंन्संल्टंट प्रा. लि. | रु. ७,००,०००/- (जी. एस.टी. सहित) |
| ९. | मिरा भाईंदर महानगरपालिका भाईंदर (प.) उत्तन येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी कल्चर फवारणी करणेबाबत. | रु.१०,००,०००/- (जी. एस.टी. सहित) | मे. चैतन्य सॉईल सायन्स प्रा. लि. | रु.१०,००,०००/- (जी. एस.टी. सहित) |

वरील निविदांना मा.आयुक्त महोदय यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) अन्वये निविदा दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दि.२६ ऑगस्ट २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात उपरोक्त कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७३ (ड) नुसार अवलोकन करण्यास शिफारस आहे.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता (घप्रवि)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

गोषवारा प्राप्त दि. २३/४/२०२३ ....... वेळ ५. २:५० वा.
प्रशासकीय ठराव सभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. ....२३.... वर्ष २०२३/२४

२३/४/२०२३
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## घनकचरा प्रक्रिया विभाग

**प्रशासकिय ठराव दिनांक १७/०५ /२०२३ रोजी वाजता**

## // ठराव //

**प्रकरण क्र. (२८) :- मा. आयुक्त सो. यांनी दिलेल्या कामांचे अवलोकन करणे.**
**(घनकचरा प्रक्रिया विभाग)**

**ठराव क्र. (२८) :-**

उपरोक्त विषयांन्वये महानगरपालिका घनकचरा प्रक्रिया विभागात विविध निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नाव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | Project management consultant for supervision on execution of construction of sanitary landfill for Mira Bhayander Municipal Corporation. | रु.१०,००,०००/- (जी. एस.टी. सहित) | मे.अमेय कंन्सल्टंट अॅण्ड इंजिनिअर्स | रु.९,९९,०००/- (जी. एस.टी. सहित) |
| २. | भाईंदर (प.) आरक्षण क्र. १४० येथे बायोगॅस प्रकल्पासाठी येणाऱ्या कचऱ्याचे मोजमाप करण्यासाठी वजनकाटा बसविण्याकरीता Civil कामे करणे. | रु. ७,८८,९००/- (जी. एस.टी. सहित) | मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | रु. ७,८८,९००/- (जी. एस.टी. सहित) |
| ३. | भाईंदर (पु.) आरक्षण क्र. १२२ "ड" येथे बायोगॅस प्रकल्पासाठी येणाऱ्या कचऱ्याचे मोजमाप करण्यासाठी वजनकाटा बसविण्याकरीता Civil कामे करणे. | रु. ७,८८,९००/- (जी. एस.टी. सहित) | मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | रु. ७,८८,९००/- (जी. एस.टी. सहित) |
| ४. | मिरारोड (पु.) आरक्षण क्र. २७१, २७२, २७३ येथे बायोगॅस प्रकल्पासाठी येणाऱ्या कचऱ्याचे मोजमाप करण्यासाठी वजनकाटा बसविण्याकरीता Civil कामे करणे. | रु. ७,८८,९००/- (जी. एस.टी. सहित) | मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | रु. ७,८८,९००/- (जी. एस.टी. सहित) |
| ५. | भाईंदर (प.) आरक्षण क्र. १४० येथे बायोगॅस प्रकल्पासाठी येणाऱ्या कचऱ्याचे मोजमाप करण्यासाठी वजनकाट्याचा पुरवठा करणे व वजनकाटा बसविण्याकरीता Electric ची कामे करणे. | रु.७,३३,७८०/- (जी. एस.टी. सहित) | मे. न्यु फिल्ड | रु.७,३३,७८०/- (जी. एस.टी. सहित) |
| ६. | भाईंदर (पु.) आरक्षण क्र. १२२ "ड" येथे बायोगॅस प्रकल्पासाठी येणाऱ्या कचऱ्याचे मोजमाप करण्यासाठी वजनकाट्याचा पुरवठा करणे व वजनकाटा बसविण्याकरीता Electric ची कामे करणे. | रु.७,३३,७८०/- (जी. एस.टी. सहित) | मे. न्यु फिल्ड | रु.७,३३,७८०/- (जी. एस.टी. सहित) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | मिरारोड (पु.) आरक्षण क्र. २७१, २७२, २७३ येथे बायोगॅस प्रकल्पासाठी येणाऱ्या कचऱ्याचे मोजमाप करण्यासाठी वजनकाट्याचा पुरवठा करणे व वजनकाटा बसविण्याकरीता Electric ची कामे करणे. | रु.७,३३,७८०/- (जी. एस.टी. सहित) | मे. न्यु फिल्ड | रु.७,३३,७८०/- (जी. एस.टी. सहित) |
| ८. | To file petition Before MERC for determination of project specific tariff for supply of electricity for ५७५ KVA capacity as per Prevalent rules and regulation and assist MBMC till tariff order is issued by MERC. | रु. ७,००,०००/- (जी. एस.टी. सहित) | मे. एनर्जी ऑप्टीमा कंन्सल्टंट प्रा. लि. | रु. ७,००,०००/- (जी. एस.टी. सहित) |
| ९. | मिरा भाईंदर महानगरपालिका भाईंदर (प.) उत्तन येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी कल्चर फवारणी करणेबाबत. | रु.१०,००,०००/- (जी. एस.टी. सहित) | मे. चैतन्य सॉईल सायन्स प्रा. लि. | रु.१०,००,०००/- (जी. एस.टी. सहित) |

वरील निविदांना मा.आयुक्त महोदय यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) अन्वये निविदा दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दि.२६ ऑगस्ट २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात उपरोक्त कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७३ (ड) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

(दिलीप ढोले)
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत: घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.**

F:\Ghankchra prakalpa vibhag\2022-23\Ghankachra Praklpa Vibhag\8. MAHASABHA THARAV\16..docx